23-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/22/2025 11:38 PM Page 1



# प्रशासकीय यंत्रणा सक्षम करण्यासाठी सहकार्य करा

## मुख्यमंत्र्यांची डिचोलीत विविध ठिकाणी आकस्मिक भेट | अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली धास्ती

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २२** : डिचोली तालुक्यात प्रशासकीय यंत्रणा अधिक गतिमान व सक्षम करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची गरज असून सरकार त्यासाठी अधिक जोर देत आहे. तालुक्यातील जनतेचे प्रश्न तातडीने लावण्याचे सूचना देण्यात आल्या असून मामलेदार कार्यालयातील तलाठी सर्वेयर तसेच इतर पदे भरतानाच ज्या त्रुटी आहेत त्या तातडीने दूर करण्यासाठी आपले प्रयत्न असतील.

सर्व सहकारी अधिकाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपताना जनतेला उत्तम सेवा देणे हे त्यांचे परम कर्तव्य आहे त्याबाबत सरकार बा रकारनेलक्ष देत आहे. लेट लतीफ कामचुकार कर्मचारी यांचा आढावा घेतला जात आहे. त्यामुळे जबाबदारी ओळखून जनसेवेला प्राधान्य देण्याचे



डिचोली : मामलेदार कार्यलयात नियोजित प्रशासकीय संकुलचा आढावा घेताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, आमदार प्रेमेंद्र शेट, संजय शेट्ये पाहणी करताना मुख्यमंत्री व इतर.

मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी डिचोली येथे केले.मामलेदारात कार्यालयात मुख्यमंत्र्यांनी आकस्मिक भेट देऊन त्या ठिकाणी आढावा घेतला यावेळी आमदार डॉक्टर चंद्रकांत शेट्ये, आमदार प्रेमेंद्र शेट,मामलेदार आदी उपस्थित होते.

**प्रशाससकीय इमारत लवकरच पायाभरणी**

डिचोली त सुसज्ञ अशी प्रशासकी इमारत सुमारे ८० कोटी रुपये खर्च उभारण्यात येणार असून त्या संदर्भातील मुख्यमंत्र्यांनी जुनी इमारत तसेच बाजूला असलेले जुने पोलीस स्टेशन या ठिकाणी च्या जागेत हा प्रकल्प साकारत असल्याचे सांगितले.या ठिकाणी वन प्लस फाईव्ह असा प्रकल्प येणार असून त्या ठिकाणी अनेक प्रशासकीय कार्यालय सुरू करण्यात येतील तसेच पहिल्या टप्प्यात वन प्लस थ्री व दुसऱ्या टप्प्यात उर्वरित इमारत बांधण्याचा संकल्प असून या ठिकाणी कलाभवनाची सुविधा असेल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी येथील शासकीय तंत्रनिकेतनातही भेट देऊन त्या ठिकाणी वेगवेगळ्या समस्या जाणून घेतल्या तसेच कशाप्रकारे कामकाज चालते याचाही आढावा घेतला ज्या काही समस्या आहेत त्या आम्ही तातडीने सोडू जे जे वेगवेगळे विविध कोर्सेस आहेत त्याचा सातत्याने पाठपुरावा करताना सातत्याने आपला अहवाल शिक्षक वर्गाने जाहीर करावा अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

यावेळी मामलेदार तसेच आयटीआय व शासकीय तंत्रनिकेतन अधिकाऱ्यांची त्यांनी चर्चा केली. प्रशासन सजक कार्यतत्पर असणे गरजेचे असून आज आपण जिल्हाधिकारीव वरिष्ठ अधिकऱ्यांची विशेष बैठक घेतल्याचे स्पष्ट केले.

अचानक मुख्यमंत्री या कार्यालयात दाखल झाल्यानंतर आश्चर्याचा धक्का बसला तर काही लेड लतीफ नाही जरबं बसली.

मुख्यमंत्र्यांनी सरकारी अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत त्यांनी वेळेत हजर राहणे वेळेत काम करणे लोकांना चांगली वागणूक देणे हे त्यांचे कर्तव्य मानून त्यांनी काम करणे बंधनकारक आहे. कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची दिरंगाई सहन केली जाणार नाही. सरकार हे पारदर्शक असून जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

पान १ वरून

### महामार्ग अधिकारी आणि रहिवाशांत खडाजंगी

असल्याचे नमूद केले होते, तर सध्याच्या सादरीकरणात फक्त २५ मीटर जागेचा उल्लेख करण्यात येत आहे. २५ मीटरमध्ये सहा पदरी महामार्ग आणि उड्डाणपूल कसा बसेल? असा प्रश्न स्थानिकांनी उपस्थित केला. त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याशी याबाबत स्पष्टता मागण्याचा इशारा दिला. सातेरी मंदिराचे पुजारी बाबुसो झल्मी यांनी सांगितले की, भोम हे सर्व देवतांचे उगमस्थान आहे. येथील प्रत्येक टेकडी, जागा पवित्र आहे. सरकारने हे गाव नष्ट करू नये. स्थानिकांनी असेही स्पष्ट केले की गावकऱ्यांमध्ये फूट पडल्याच्या अफवा खोट्या असून सर्वजण एकत्र आहेत.

भोमकरांचे नेते संजय नाईक यांनी सांगितले की, हा चार घरांचा नव्हे, तर संपूर्ण गावाचा आणि धार्मिक स्थळांचा प्रश्न आहे. सरकारने शेताच्या मार्गावरून बायपास निर्माण करावा. जर आधीच्या प्रस्तावात बायपास शक्य आहे असे दाखवण्यात आले असेल तर तो आता शक्य नाही हे कोणत्या आधारावर मुख्यमंत्री सांगत आहेत? असा सवालही नाईक यांनी केला.

स्थानिक नागरिक पुतू गावडेयांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत विचारले की, बायपास नाकारण्यात जर खाजन जमिनीचे रक्षण करणे सरकारचे धोरण असेल, तर भोम येथे ती जमीन नष्ट का केली? आणि बोरी पुलासाठी लोटली येथील खाजन जमिनीवर का प्रस्ताव ठेवला?

भोम येथे हे मोजमाप सुरू असताना महामार्ग विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थ यांच्यात अनेकवेळा हमरीतुमरी झाली .मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करीत कोणताही अनुचीत प्रकार होऊ दिला नाही. सोमवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी दावा केला होता की , मंगळवरच्या सीमांकनानंतर भोम वासीयांचे गैरसमज दूर होतील आणि ते सकारात्मक निर्णय घेतील . मात्र ज्या प्रकारे मंगळवरी भोम वासीय आक्रमक झाले आणि बायपासच्या मागणीवर अडून बसले ते पाहता हा विरोध कमी झाला असे म्हणता येणार नाही . त्यामुळे येत्या काही दिवसात पुन्हा हा प्रश्न पेटण्याची शक्यता आहे .

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत आश्वासन दिले आहे की कोणत्याही धार्मिक स्थळांना त्याचा फटका बसणार नसून त्या ठिकाणी विद्यमान मर्यादेत उन्नत रस्ता (फ्लायओव्हर) नियोजित आहे. त्यासाठी ९.६ किमी रुंदीकरण योजनेच्या या प्रकल्पाला ५५७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

--------------------

### शाळांना शैक्षणिक कामगिरीच्या नोंदी ठेवण्याचे निर्देश

औद्योगिक प्रशिक्षण संस्था पॉलिटेक्निक, स्थानिक उद्योग यांच्यासोबत सहकार्य करण्याचे निर्देश दिले गेले आहेत. गोवा राज्यातील सर्व सरकारी/सरकारी अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांच्या प्रमुखांना हे निर्देश दिले गेले आहेत की, त्यांनी इयत्ता नववी आणि दहावीच्या सर्व शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षणाच्या माहितीची माहिती देण्यासाठी त्यांच्या जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना भेट द्यावी. तसेच, दहावी आणि बारावी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे नोंदी ठेवण्यासाठी शाळांना आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत, असे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

--------------

### चिंचणीमध्ये महिलांसाठी टेलरिंग आणि एम्ब्रॉयडरी प्रशिक्षण सुरू

शिवणकाम किंवा भरतकाम शिकविण्यापुरता मर्यादित नाही, तर महिलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि आर्थिक स्वावलंबन निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमाची सकारात्मक दखल घेत डॉ. फ्लोरा यांनी पारंपरिक कौशल्यांचा वापर करून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवण्याच्या प्रयत्नाचे कौतुक केले. कार्यक्रमास स्थानिक स्तरावर उत्तम प्रतिसाद लाभला असून, या प्रशिक्षणाच्या माध्यमातून उत्पन्ननिर्मितीचे नवीन मार्ग खुले होतील, तसेच संपूर्ण गावाच्या सामाजिक–आर्थिक विकासास हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# पेडणेत 'स्वर संध्या' कार्यक्रम उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २२** : श्री वंसदेव प्रसन्न कासारवडणे, पेडणे येथे वार्षिक सत्यनारायण पूजा प्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या 'स्वर संध्या' कार्यक्रमात मोठा उत्साह दिसून आला. उद्घाटनानंतर ज्येष्ठ कलाकार गुरुनाथ परब आणि रामचंद्र शेटकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने गायनाचा कार्यक्रम आयोजित केला गेला, ज्यामध्ये गायक गोविंद मराठे आणि सुरेश केरकर यांनी आपल्या गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यामध्ये श्री विकास नाईक यांनी तबला साथ दिली. तर संवादिनीसाठी कुमारी



पेडणे : गुरुनाथ परब यांचा गौरव करताना नागेश गोसावी व इतर.

लोचन च्यारी आणि ऑर्गनसाठी संकेत संतोष शेटकर यांनी साथ केली. मंजिरीबरोबर साथ करणारे अनिल गाठ यांनी देखील योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष शेटकर यांनी केले. कार्यक्रमात उपस्थितांमध्ये गडद उत्साह पाहण्यास मिळाला आणि सगळ्यांनी मिलिंद संगीताच्या आनंदाचा अनुभव घेतला.


# हेडगेवारच्या विद्यार्थ्यांसाठी सृजनशीलतेला वाव देणारा उपक्रम

## कला अकादमीत 'चैत्रपालवी' चित्र प्रदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२** : डॉ. के. ब. हेडगेवार विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणारे स्तुत्य उपक्रम हे विद्यालय राबवित असते. असाच एक उपक्रम म्हणजे 'चैत्रपालवी' चित्र प्रदर्शन. हे प्रदर्शन कला अकादमीच्या कला दालनात भरले असून यात इयत्ता पाचवी ते बारावीच्या ५० विद्यार्थ्यांनी





साकारलेली ९० चित्रे आहेत. इयत्ता सातवीतल्या देवश्री गाडगीळ, अद्विता नाईक, तनिषा नाईक, सनय बांदोडकर, विग्नंता खुले ,वैष्णवी आमोणकर, सनीत शिरोडकर , परिधि बेतोडकर यांच्या चित्रकृती लक्षवेधी आहेत. सहावीतील अंगद गाडगीळ चितारलेला गौतम बुद्ध, दुर्गेश पी. नाईक याने रंगवलेला माखन खाणारा बालकृष्ण, दहावीतील समीक्षा वेळीप हिचे सुरेख निसर्गचित्र, चैतन्य अडकोणकर याचे घराच्या कुंपणावर बसलेला कोंबडा, नीती आमोणकर चे निसर्गचित्र, आठवीतील समर्थ बांदिवडेकर ची मारिओ मिरांडा यांच्या शैलीतील प्रभावी चित्रकृती, आदी चित्रकृती पहाताना कौतुक वाटते. या विद्यालयाचे शिक्षक तथा प्रतिभाशाली चित्रकार प्रविण नाईक यांनी घेतलेली मेहनत जाणवत होती.ड. उल्हास पै रायकर यांच्या हस्ते सोमवारी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्याध्यापक विलास सतरकर, विद्यालयाचे व्यवस्थापक सुभाष देसाई, पालक शिक्षण संघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत वायंगणकर, उपाध्यक्ष सुदेश खुळे, माजी अध्यक्ष डॉ. अजित म्हापणे उपस्थित होते.

# पाडलोस रस्त्यावर दुतर्फा मांडलेले; दगड अद्यापही तसेच

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. २२** : पाडलोसमध्ये रस्त्याच्या दुतर्फा साईड पट्टीवर मांडण्यात आलेले दगड जैसे थे आहेत. दोन वाहनांना बाजू देताना अपघातासह गाड्या पंक्चर होण्याची दाट शक्यता आहे. आठ दिवसांत साईडपट्टीवर रोलर न फिरवल्यास अधिकाऱ्यांना घेराव घालण्याचा इशारा पाडलोस ग्रामपंचायत माजी सदस्य नंदा गावडे यांनी दिला आहे.

पाडलोसमध्ये पंधरा दिवसांपूर्वी रस्त्याच्या दुतर्फा साईड पट्टी निर्धोक करण्यासाठी दगड मांडण्यात आले आहेत. परंतु त्या दगडांवर तत्काळ लोडर फिरवणे गरजेचे होते. समोरच्या वाहनाला बाजू देताना वाहन रस्त्याच्या बाहेर न्यावे लागते. धोकादायक दगडांवर वाहने गेल्याने अनेक वेळा पंक्चर झाल्याच्या घटना घडल्या. पावसाळा तोंडावर आला असून सदर दगडांवर माती व पाण्याच्या साहाय्याने साईडपट्टी निर्धोक करावी अशी मागणी माजी ग्रामपंचायत सदस्य नंदा गावडे यांनी प्रशासनाकडे केली आहे.




मन दर्पण चे प्रकाशन करतांना प्राचार्य अनिल सामंत सोबत नीलेश नाईक,सागर जावडेकर, दशरथ परब, श्रुती जोशी, वरदा गाड केरकर , निलेश बुगडे व इतर

# संवेदनांची कविता दीर्घकाळ स्मरणात रहाते

## प्राचार्य अनिल सामंत : 'मन दर्पण' या कविता संग्रहाचे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२** : संवेदनांची कविता दीर्घकाळ स्मरणात रहाते. जाणिवा नव्याने विकसित करते ती चांगली कविता. मन दर्पण कविता संग्रहात भावभावना आहेत पण त्याचबरोबर जीवनाविषयीची चिंतनशीलता विचार विणेतून नादमय होते व विचारांचे वलय निर्माण करते, असे प्रतिपादन गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत यांनी फोंडा येथे केले.

लेखिका, निवेदिका, मुलाखतकार श्रुती हजारे यांच्या 'मन दर्पण' या पहिल्यावहिल्या कविता संग्रहाचे प्रकाशन, रविवारी गोवा मराठी अकादमी फोंडा तालुका प्रभाग समिती, गुरुकृपा प्रकाशन, विद्या वृद्धी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शांतीनगर फोंडा येथील विद्या वृद्धी किड्स नेस्ट विद्यालयात झाले, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य सामंत बोलत होते. व्यासपीठावर सन्माननीय पाहुणेज्येष्ठ पत्रकार सागर जावडेकर, इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा चे अध्यक्ष दशरथ परब, गोवा मराठी अकादमी फोंडा प्रभाग समितीचे अध्यक्ष नीलेश नाईक, सचिव वरदा गाड केरकर, श्रुती हजारे व प्रकाशक नीलेश बुगडे उपस्थित होते. प्राचार्य सामंत म्हणाले, श्रुती हजारे यांनी अनुकरण न करता अनुभव काव्यबद्ध केले आहेत. सागर जावडेकर म्हणाले, यातील कविता सकारात्मक आहेत व त्या विचार करायला लावतात. नीलेश नाईक यांनी स्वागत केले. राधिका काळे, वरदा गाड, उमेश गावणेकर, मेधा देसाई, श्रद्धा शिरोडकर, वेदा पत्की, गिरीश काकोडकर यांनी मन दर्पण मधील कविता सादर केल्या. मुखपृष्ठ बनविलेल्या ईश्वरी हजारे व प्रकाशक नीलेश बुगडे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.मंजिरी वाटवे यांनी श्रुती हजारे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्यावरील एक कविता सादर करून त्यांना वाढदिवसाची आगळी भेट दिली.नितीन कोलवेकर यांनी सूत्रसंचालन केले. सागर हजारे यांनी आभार मानले. उषा टेंग्से, प्रिया नाईक, मंजिरी वाटवे यांनी पसायदान म्हटले. या सोहळ्याला मोठी उपस्थिती लाभली होती.

---

**सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया**
**Central Bank of India**
1911 से आपके लिए "सेंट्रल" — "CENTRAL" TO YOU SINCE 1911

क्षेत्रीय कार्यालय पणजी, निझारी भवन, 1 ला मजला, सिने नॅशनल जवळ, मिनेझिस ब्रागांझा रोड, पणजी (गोवा) – 403001
दूर.क्र. 0832-2224385, 2425105
ईमेल : recoverypanaro@centralbank.co.in

आरओ/आरईसीव्ही/202425/187 — दि. 17/03/2025

### मागणी सूचना

**हमीदारास मागणी सूचना : प्रति, श्री. देविया देविदास शेटकर, पत्ता** : घर क्र. 8/एम, फातिमा चर्चजवळ, प्रभाग क्र. 1, दिकरपाल नावेली, दक्षिण गोवा, गोवा–403707.

**सह–कर्जदारास मागणी सूचना : प्रति, श्री. योगेश्वर देविदास शेटकर, पत्ता** : घर क्र. 8/एम, फातिमा चर्चजवळ, प्रभाग क्र. 1, दिकरपाल नावेली, दक्षिण गोवा, गोवा–403707.

**कर्जदारास मागणी सूचना : प्रति, देवीदास मास्सो शेटकर, पत्ता** : घर क्र. 8/एम, फातिमा चर्चजवळ, प्रभाग क्र. 1, दिकरपाल नावेली, दक्षिण गोवा, गोवा–403707.

**विषय : सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,** 2002 **च्या कलम** 13(2) **खाली कर्जदारांना मागणी सूचना.**

खाली सही करणारा **मुख्य व्यवस्थापक** असून सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यानंतर संक्षिप्त संबोधण्यासाठी सदर सरफासी कायदा असा उल्लेख राहील) खाली सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा प्राधिकृत अधिकारी म्हणून त्याच्या क्षमतेत याद्वारे तुम्हाला नोटीस देतो ती खालीलप्रमाणे आहे :

तुम्हांस ज्ञात आहे की, तुमच्या विनंतीवरून **सेंट्रल बँक ऑफ इंडियाने** (यानंतर सदर बँक असा उल्लेख राहील) त्यांच्या मडगाव शाखेद्वारे येथे खाली दिलेल्या अनुसुची अ च्या रकाना 2 व 3 मध्ये तपशीलवारपणे दिल्यानुसार तुम्हाला आर्थिक साहाय्य दिले होते.

सदर आर्थिक साहाय्य इतर गोष्टींबरोबर हे बँकेच्या नावे सुरक्षा हितसंबंध तयार करून तसेच इतर गोष्टींबरोबर मालमत्तेच्या तपशीलासह अनुसूची ब मध्ये तपशीलवारपणे/ दिलेल्या पद्धतीने सुरक्षा दस्तावेजासह त्यायोगे मंजूर केले होते.

की, तुम्ही सदर खात्याची कार्यवाही केली नाही व मंजुरीच्या अटींनुसार बँकेला देय रकमेची परतफेड केली नाही आणि त्यानंतर वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पारीत केलेल्या लागू मार्गदर्शक सुचनांनुसार 28-02-2025 पासून एक अकार्यवाही (नॉन परफॉरमिंग असेट)म्हणून तुमचे खाते वर्गीकृत करण्यात आले. बँकेद्वारे वारंवार केलेल्या विनंत्या असूनही तुम्ही बँकेस देय रकमेची परतफेड करण्यात अपयशी ठरलात.

तुमच्याकडून देय रकमेचा सुविधानिहाय तपशील येथे खाली दिलेल्या अनुसुचीच्या रकाना 4 ते 10 मध्ये दिला आहे. तुमच्याकडून एकूण देय असलेली रक्कम ही विविध आर्थिक सुविधांखाली देय असलेल्या एकूण रकमेची बेरीज आहे, जी येथे खाली दिलेल्या अनुसुचीच्या रकाना 4 ते 10 मध्ये दिली असून ती **रु. 18,21,142.15/- (रु. अठरा लाख एकवीस हजार एकशे बेचाळीस व पैसे पंधरा फक्त)** आहे व तुम्ही सदर संपूर्ण रकमेच्या परतफेडीत बुडवेगिरी केलेली आहे.

म्हणून, तुम्हाला याद्वारे सरफासी कायद्याच्या कलम 13(2) खाली कळविण्यात येते की, या नोटीशीच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत कंत्राट अटी आणि –किंवा कायद्यानुसार तुमच्याकडून येणे असलेल्या वसूल करावयाच्या **17-03-2025** रोजीच्या नोटीस तारखेपासून अनुसूची अ मध्ये दिलेल्या **रु. 18,21,142.15/- (रु. अठरा लाख एकवीस हजार एकशे बेचाळीस व पैसे पंधरा फक्त)** अधिक संपूर्ण भरणा जमा होईपर्यंत लागू व्याज दराने त्यावर साठलेले त्यापुढील व्याज, नैमित्तिक खर्च, चार्जेस व किमतींसह असलेल्या रकमेचा भरणा तुम्ही करावा.

येथे वर दिलेल्या रकमेचा भरणा करण्यासाठी तुम्हाला कळवले जात आहे ती रक्कम बँकेत जमा करण्यात तुम्हाला अपयश आल्यास बँक त्याखाली केलेल्या नियमांसह सरफासी कायद्याच्या तरतुदींखाली उपलब्ध असलेल्या सर्व किंवा एखाद्या अधिकारांचा वापर करेल.

तसेच तुम्हाला नोटीस देण्यात येते की, कलम 13(13) च्या अनुषंगाने बँकेची लेखी संमती घेतल्याशिवाय विक्री किंवा अन्य व्यवहाराद्वारे अनुसुची ब मध्ये तपशीलासह दिलेल्या सुरक्षित मत्ता हस्तांतरित न करण्यास कायद्याने बांधील आहात.

तसेच सरफासी कायद्याच्या कलम 29 कडे तुमचे लक्ष वेधण्यात येते ज्याखाली या सरफासी कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास एक वर्षांपर्यंत कैद किंवा दंड किंवा दोन्हीही सह तो शिक्षापात्र गुन्हा ठरेल.

ही नोटीस पूर्वग्रहाशिवाय दिली जात आहे आणि बँकेने अगोदरच वापरलेल्या आणि/किंवा वापरेल असे कोणतेही अन्य अधिकार वा हक्क किंवा उपाय सोडून दिले आहेत असे समजू नये आणि त्यात सदर देय रकमेच्या वसुलीसाठी कोणतीही कायदेशीर कारवाई समाविष्ट आहे व तुम्ही आम्हाला देय असलेल्या व सापडलेल्या/राहिलेल्या देय रकमांसाठी केल्या जाणाऱ्या यापुढील मागण्या समाविष्ट आहेत.

सदर सुरक्षित मत्ता पुन्हा मिळवण्यासाठी सरफासी कायद्याच्या कलम 13 (8) मधील तरतुदींकडे आपले लक्ष वळविण्यात येत आहे.

**अनुसुची अ**
**मंजूर केलेल्या आणि घेतलेल्या आर्थिक सुविधांचा तपशील व देय रक**

| | |
|---|---|
| 1. | मंजूर केलेली व घेतलेल्या आर्थिक साहाय्याचा प्रकार : सेंट होम लोन |
| 2. | मंजूर केलेल्या आर्थिक साहाय्याची रक्कम : रु. **20,00,000/-** |
| 3. | नोटीस तारखेला लेजरमधील उर्वरित एकूण देय रक्कम : रु. **17,91,476.15/-** |
| 4. | लेजरमध्ये आकारलेले व्याज या तारखेपर्यंत : **31-01-2025** |
| 5. | नोटीस तारखेला लेजरमधील शेवटी आकारलेल्या व्याजाच्या तारखेपासून दंडात्मक व्याज वगळून व्याजाची रक्कम, काही असल्यास, ती : रु. **29,605/-** |
| 6. | रकाना **(6)** मध्ये हिश्शे केली रक्कम जी चक्रवाढीच्या नियतकालिकेव्याजाचा दर : मासिक |
| 7. | नोटीस तारखेला पाठीमागे आकारलेल्या देडात्मक व्याज तारखेपासून जमा झाल्याशिवाय आकारलेल्या दंडात्मक व्याजाची रक्कम : रु. **61.00/-** |
| 8. | कायदा– मंजुरी अठींनुसार, काही असल्यास, नैमित्तिक खर्च, चार्जेस व किमती. |
| 9. | नोटीस तारखेला एकूण देय रक्कम : रु. **18,21,142.15/-** |

**अनुसुची ब**
**(कर्जदाराने स्वाक्षरी केलेल्या सुरक्षा दस्तावेजांचा तपशील)**

दस्तावेजांची तारीख व स्वरुप (तारण करार गहाणवट करार करार इ.) ज्यायोगे या कोष्टकातील रकाना 2 मध्ये दिलेल्या मत्ता सुरक्षित केल्या आहेत.

| | |
|---|---|
| 1. | विक्रीचा मूळ करार दि. **28-04-2002**, दि. **27-05-02** रोजीच्या खंड क्र. **1** व्हॉल्यूम क्र. **1335** च्या पृष्ठ **241** ते **261** वर क्र. **167८** खाली नोंदणीकृत. |
| 2. | मूळ रेक्टीफिकेशन करार दि. **27-08-02.** |
| 3. | भारमुक्त प्रमाणपत्र. |
| 4. | फॉर्म **1** व **14** ची प्रत. |
| 5. | घरपट्टी पावतीची प्रत. |
| 6. | पाणी पट्टी व वीज बिलाची प्रत. |
| 7. | ताबा दाखल्याची प्रत. |
| 8. | विक्री करार प्रत दि. **11.07.1994.** |

**अनुसूची क**
**(सुरक्षित मत्ता/गहाणवट मालमत्ता / तारण ठेवलेल्या सामानाचे तपशीलवार वर्णन)**

**स्थावर मालमत्ता** : गोवा राज्यातील दक्षिम गोवा जिल्ह्यातील सालसेत तालुक्याच्या दवर्ली–दिकरपाल ग्रामपंचायत क्षेत्रात दिकरपाल येथे असलेल्या **नोवी दावी शीर** या नावाच्या मालमत्तेतील 302.00 चौ.मी. क्षेत्रफळाचा प्लॉट क्र. 7 चा संपूर्ण भाग जो सालसेतच्या भू नोंदणी कार्यालयात (कॉनझरवेटोरिया दो रेजिस्टो प्रेडियल) नोंदवेलला नाही व दिकरपाल गावाच्या क्र. 198 खाली भू महसूल यादीत (मात्रिज प्रेडियल) मध्ये नोंदवलेला आहे व दिकरपाल गावाच्या सर्व्हे क्र. 13/3 व 2/61 खाली सर्वेक्षित आहे. व त्याच्या **चतु:सीमा पुढीलप्रमाणे** : **उत्तरेस** : सदर मालमत्तेचा प्लॉट क्र. 13, **दक्षिणेस** : सदर मालमत्तेचा प्लॉट क्र. 4, **पूर्वेस** : सदर मालमत्तेचा प्लॉट क्र. 6, **पश्चिमेस** : 8 मी. रुंद रस्ता.

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**

---

**NOTICE**

My Husband **Late John A. Desai** was owning **Maruti WagonR VXI BS4 Car** bearing **Reg. No. GA-06-D-5563.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

**Date: 22.4.2025** Sd/- **Smt. Usha John Desai**
**F. No. S/4, Tamrind Court B, Chowgule Garden, Zorint, Zuarinagar, Mormugao, South Goa, Goa 403726.**

*Sandeep Ads*

---

**CHANGE OF NAME**

I, MARTHA PINTO, spouse of 657581-A Ex-SGT Augusto Z. Pinto, resident of 253/7, Santa Cruz Vaddo, Vaddem, Socorro, P.O. Porvorim, Bardez, Goa, have changed my name from MARTHA PINTO to **MARTHA VERONICA PINTO** vide self declaration dated 22.04.2025

---

**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY (EX- OFFICIO) OF TISWADI JUDICIAL DIVISION AT PANAJI, GOA**

NO.CRSR/TISWADI/NOT/ 331/2025
Dated: 11/04/2025

**NOTICE**

Shri. Manuel Vales, Joint Civil Registrar cum Sub Registrar and Special Notary (Ex-Officio) of Tiswadi Judicial Division at Panaji-Goa.

In accordance with the Section **346 (11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012"**, it is hereby made public that by a Notarial Deed of Succession dated 02nd April, 2025 recorded before me in Book No, 768 of Notarial deeds at page 162 onwards the following is noted:-

**That late Alexandre Eleuterio De Joven Silveira alias Alexander Eleuterio Silveira alias Alexandre Eleuterio Joven Da Silveira expired on 25/04/2021 at Holy Family Hospital, Okhla Road, New Delhi South okhla South east Delhi India 110025, in the status of married interstate that is without executing any will or any other disposition in respect of his estates and leaving behind upon his death as heirs, his widow Smt. Maria Elsa Angela Gracias alias Smt. Maria Elsa Angela Silveira alias Smt. Maria Elsa Angela Gracias e Silveira, D/o late Joaquim Sebastian Rosario Gracias and widow of late Alexandre Eleuterio de Joven Silveira, aged on, retired, Indian National, as moiety holder and half sharer and universal heirs his two children (one) Braden Elston Silveira, son of late Alexandre Eleuterio de Joven Silveira, 41 years of age, Service, Indian National, married to Larisa Jeanne Gonsalves, D/o Francis Gonsalves, 37 years of age, Service, Indian national (two) Neiza Maria Shanina Silveira, daughter of late Alexandre Eleuterio de Joven Silveira, 37 years of age, unmarried, service, all above residing at House No 210. SFS Flats, Pocket-1, Sector-1, Dwarka Sector, vi, south west Delhi India and besides** that there does not exist any other person or persons who according to the prevailing law in force in the State of Goa may have a legal right of Succession or would prefer in the said succession or would concur to the inheritance left behind by said deceased persons.

Any person having objection to this deed, may file in this Office within one month from the date of its publication.

Sd/- **(Manuel Vales)**
Special Notary (Ex-Officio), Tiswadi,
Panaji- Goa.
CIVIL REGISTRAR
CUM-SUB-REGISTRAR, ILHAS

---

**CHANGE OF NAME**

I, **DIPIKA VISHWAS FATERPEKAR** Resident of H No 386, Near Cuncolikarin Temple, Fatorpa Quepem Goa has change my name from **KUMUD DINA PERNI** to **DIPIKA VISHWAS FATERPEKAR**. Hereinafter in all my dealings and documents I will be known by new name of as **DIPIKA VISHWAS FATERPEKAR.**

---

**CHANGE OF NAME**

I, **Awroline Denise Fernandes** residing at: **House No. 889/A, Cormugale, Curtorim, Salcete, Goa, 403709** Indian Citizen holding Passport no K4080196(Expired)hereby declare that I have changed my name from Awroline Denise Fernandes E Dsilva to **Awroline Denise Fernandes**. I wish to correct my name on the new Passport as Given Name: **Awroline Denise** Surname: **Fernandes.**

---

**GOVERNMENT OF GOA**
**OFFICE OF THE ASSTT. REGISTRAR OF COOPERATIVE SOCIETIES, ARBITRATION/ EXECUTION, NORTH GOA DISTRICT,**
**At "Sahakar Bhavan", 1st Floor, Curti, Ponda Goa.**

**ABN Case No.:- ARCS/VPK/SANQUELIM/2024/ABN/2526**

VPK Urban Co-operative Credit Society Ltd.
Sanquelim Branch, Sanquelim Goa. **...Disputant**
V/s
1.Mr.Johnson Dayalan Benjamin
H.No.52 Churchwada Corlim Tiswadi Goa.
2.Mr.Lourdhu Nathan M Flat No.F-2 Madkaikar Colony Opp VPK Society Corlim Goa.
3.Mrs.D.Stella Dayalan Benjamin
H.No.52 Churchwada Corlim Tiswadi Goa.
**....Opponents**

**(Summons under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908)**

To,
The Opponent No. 1

WHEREAS, the above mentioned disputant society has instituted a dispute against you, Opponents for recovery of dues, in terms of section 83 of the Goa Co-operative Societies Act, 2001.

AND WHEREAS the disputant has claimed a sum of Rs.98168.70 (Rupees Ninety Eighty Thousand One Hundred Sixty Eight and paise Seventy Only with accrued interest thereon and cost.

AND WHEREAS, the proceedings has been initiated into the same and the summons/notice issued to you at your last known address returned unserved with postal remarks "Addressee Left returned to sender".

AND WHEREAS, the disputant vide application dated 22.04.2025 prayed to publish the notice on local newspaper as substitute service as required under Order V Rule 20 (1-A) of C.P.C. 1908.

AND WHEREAS the court is satisfied that this is fit case for ordering substitute service by publication of notice on local newspaper.

NOW THEREFORE, the above opponents hereby summoned by this notice to appear before me in person on 13.05.2025 at 03.00 p.m. and to produce on that day all the documents upon which they intend to rely in support of their defense.

TAKE NOTE that in default of your appearance on the date and the time as stipulated above, the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand & seal of this office on this 22nd day of April 2025.

SEAL — Sd/- **(Harischandra S. Gawde)**
Asstt. Registrar of Co-op Societies
ABN/EXE North Goa District Curti Ponda- Goa.
Date: 21.01.2025
Place: Ponda